नि.मु.नं. ८९६/२०२४
निशाणी क्र. ३१.

## निशाणी क्र. ३१ खालील आदेश.
## परमेश्वर व ईतर १ वि. शिवाजी व ईतर २८
## CNR No.MHLA140028042024

प्रस्तुत अर्ज हा प्रतिवादी क्र.१, २ व १३ यांनी त्यांचे प्रस्तुत दाव्याकामी असलेले लेखी म्हणणे दाखल करण्याकामी झालेल्या विलंबाकरीता उशिरमाफी करीता अर्ज केला आहे.

२. प्रतिवादींनी अर्जात असे कथन केले की, प्रस्तुत दाव्याकामी म्हणणे दाखल करण्याकरीता मुदतीत कागदपत्र वेळेत प्राप्त न झाल्यामुळे व शेतीकामात व्यस्त असल्यामुळे ते मुदतीत जबाबदावा दाखल करू शकले नाहीत. प्रतिवादी यांनी जाणुन-बुजुन जबाबदावा देणेस उशीर केलेला नाही. त्यामुळे, कैफियत दाखल करण्याकामी झालेला विलंब माफ होऊन मिळावा अशी विनंती केली.

३. वादींना मुदत देवुन देखील त्यांनी सदर अर्जावर म्हणणे दाखल न केल्यामुळे सदरचा अर्ज त्यांच्या म्हणणेविना चालविण्यात येत आहे.

४. प्रतिवादींच्या विधीज्ञांचा युक्तिवाद ऐकला. दिवाणी प्रकिया संहितेनुसार प्रत्येक दाव्यात गुणदोषावर चौकशी होणे न्यायाचे दृष्टीने आवश्यक असते. अशा चौकशीसाठी पक्षकाराचे म्हणणे दाखल होणे व त्याची योग्य बाजु मांडणे हे न्यायाच्या दृष्टीने आवश्यक असते. त्यामुळे, न्यायाच्या दृष्टीने नैसर्गिक न्यायतत्वाच्या आधारे प्रतिवादींना त्याची बाजु मांडण्याची संधी मिळणे न्यायोचित आहे. सबब खालीलप्रमाणे आदेश:-

## आदेश

१. अर्ज मंजुर करण्यात येतो.

२. प्रतिवादी क्र.१, २ व १३ यांना कैफियत दाखल करण्याकामी झालेला **५००/- (अक्षरी पाचशे रूपये फक्त)** च्या खर्चावर माफ करण्यात येतो.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by PARAG PHADNIS AWATE
Date: 2025.09.24 16:57:01 +0530

ठिकाण-औसा.
दिनांक : २४/०९/२०२५.

**(श्री. पी. पी. आवटे)**
सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, औसा